## - नळ कनेक्शनधारकांना सूचना -

1) आपल्या पाणी बिलाचा अद्ययावत तपशील ऑनलाईन पहाणेसाठी व बिलाची रक्कम ऑनलाईन भरणेसाठी web.kolhapurcorporation.gov.in या वेबसाईटला भेट द्या किंवा Google Playstore वरुन MyKMC हे ॲप डाऊनलोड करा. डेबीट कार्ड / क्रेडीट कार्ड / ऑनलाईन बँकींगद्वारे पाणीबील भरणेची सुविधा उपलब्ध आहे. तसेच स्पॉटबिल मोबाईल प्रणालीअंतर्गत आपलेकडे आलेल्या मिटर रिडर यांचेकडे देखील पाणी बिलाची रोख रक्कम भरणेची तसेच त्वरित पोहोच पावती मिळणेची सुविधा उपलब्ध आहे.
2) पाणी बील सुलभरित्या व सुरक्षीतरित्या भरणेसाठी Googlepay, PhonePe, Paytm, इ. मोबाईल ॲपचा वापर करता येईल.
3) पाणी बिल 30 दिवसांनंतर भरणा केल्यास बिलाच्या रक्कमेवर वार्षिक 10 टक्केप्रमाणे विलंब आकार आकारण्यात येईल. मागील थकबाकी भरत असताना प्रथम विलंब आकार भरुन घेण्यात येईल. बिलामध्ये दर्शविलेला विलंब आकार हा देयक दिनांकापर्यन्तचा समजणेचा आहे.
4) बिलाच्या बाबतीत कोणताही वाद असला तरी बिल दिलेल्या मुदतीच्या आत भरले पाहिजे. याबाबतचा मेळ तद्नंतर घालण्यात येईल.
5) बिलातील नमूद केलेली मुदत ही फक्त चालू बिलासाठी आहे. थकबाकीसाठी अंतीम तारीख विचारात घेऊ नये.
6) एखाद्या ठराविक ग्राहकाने वापरलेल्या पाण्याबाबत द्यावयाच्या रकमेस तो पात्र नाही समजू नये. ग्राहकाने स्वहिताच्या दृष्टीने बिल नियमित मिळत नसेल तर ऑफिसमध्ये चौकशी केली पाहिजे. बिलाचा कालावधी 2 महिन्याकरीता समजावा.
7) बिलामध्ये दर्शविलेली पूर्ण रक्कम नागरी सुविधा केंद्रामध्ये भरावी. पैसे भरताना बिल हजर करावे. बिलाची रक्कम अनधिकृत माणसाकडे भरल्यास त्याची जबाबदारी कार्यालयावर राहणार नाही. बिल भरल्यावर मिळालेली पावती स्वताचीच आहे व योग्य रक्कमेची आहे याची खात्री कौंऊटर सोडण्यापूर्वी करावी. यात शंका असल्यास कौंऊटरवर त्वरित सूचना द्यावी. तद्नंतर कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
8) बिलाचा भरणा शासकीय सुट्टीखेरीज सकाळी 9 ते दुपारी 3 या वेळेतच नागरी सुविधा केंद्रामध्ये स्वीकारला जाईल.
9) **बिलासंबंधी तक्रार असल्यास बिल 7 दिवसांत ऑफीसमध्ये आणून तक्रारीचे निरसन करुन घ्यावे. तद्नंतर तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**
10) बिल हरविल्यास रितसर अर्ज केल्यावर रु.5/- भरुन बिलाची दुय्यम प्रत दिली जाईल.
11) बिलासंबंधी पत्रव्यवहार करताना संपूर्ण पत्ता, कोड नं., ग्राहक नं., जोडणी क्रमांक कळविणे आवश्यक आहे. धनादेशाचे मागे ग्राहकाचे नांव,पत्ता,जोडणी क्रमांक व फोन नंबर लिहीणे आवश्यक आहे.
12) ज्या कालावधीचे / महिन्याचे बिल भरावयाचे आहे, तेच बिल कौंटरवर सादर करावे. संगणकीकृत बिलावर ग्राहकाने परस्पर कोणतीही नोंद/खाडाखोड करु नये.
13) महानगरपालिकेचे मीटर नादुरुस्त झालेस ग्राहकाने याबाबत कार्यालयाशी संपर्क साधून रितसर सुपरव्हीजन फी भरुन स्वखर्चाने मिटर बसवावे.
14) बी क्लास मॅग्नेटिक मीटर बसविणे बंधनकारक आहे. बिलाची योग्य आकारणी करणेसाठी मीटर रिडींग स्पष्टपणे दिसेल अशा ठिकाणी ठेवणेची जबाबदारी ग्राहकावर राहील.
15) महानगरपालिकेने वेळोवेळी निश्चित केलेल्या धोरणानुसार कराची आकारणी केली जाईल.
16) **धनादेशाची पावती चेक जमा झाल्यावरच ग्राहय धरली जाईल.**
17) **धनादेश न वटलेस निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्ट 1881 च्या कलम 138 नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल.**
18) **सलग तीन बिले भरावयाची राहिल्यास पाणी पुरवठा विनानोटीस खंडीत केला जाईल.**
19) **मुं.प्रां.म.न.पा.अधिनियम 1949 मधील कलम 439(1) व (2) अंतर्गत मिळकतीवर बोजा नोंद करुन थकीत रक्कम वसुलीची कारवाई करण्यात येईल.**
20) **अनधिकृतपणे (चोरुन) पाणी वापर केलेचे / मीटरचे मागून किंवा एअर व्हॉल्वमधून पाणी वापर केलेचे आढळून आलेस नियमानुसार दंडात्मक कारवाई करुन भारतीय दंड संहितेच्या कलम 430 नुसार फौजदारी गुन्हा दाखल करणेत येईल.**

**अ) मीटर बंद / नादुरुस्त / मोडतोड अवस्थेत असलेस जल देयकची आकारणी :- खालीलपैकी जे जादा असेल त्याप्रमाणे केली जाईल.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | मागील 3 बिलांची सरासरी, | 2) | मागील महिन्याची आकारणी, |
| 3) | गेल्या वर्षीच्या त्या कालावधीतील सरासरी वापर, | 4) | स्थिर आकार. |

ब) मा.प्रशासकीय ठराव क्रमांक 45, दिनांक 17/02/2021 नुसार पाणी बिलाचे सुधारित दर दि.01/04/2021 पासून पुढील सूचना प्राप्त होईपर्यन्त खालीलप्रमाणे राहतील.

1) घरगुती/निवासी वापर :- (फक्त 1/2” कनेक्शनकरीता)

| अ.नं. | पाण्याचा वापर | बिलाची आकारणी |
|---|---|---|
| अ) | 0 ते 20000 लि. | स्थिर आकार रु.190 प्रति दोन महिने |
| ब) | 20001 लि. ते. 40000 लि. | रु.190 अ रु.12.65 प्रति 1000 लि. |
| क) | 40001 लि. चे पूढे | रु.190 अ रु.12.65 अ रु.18 प्रति 1000 लि. |

**2) बिगरघरगुती/अनिवासी वापर** :- व्यापारी संस्था, शाळा, शासकीय-निमशासकीय कार्यालये, महाविद्यालये, खाजगी दवाखाने (क्लिनीक), मंगल कार्यालये, धर्मादाय संस्था किंवा ट्रस्ट (ना नफा-ना तोटा तत्वावर) इ.साठी प्रत्येक 1000 लिटर्सकरीता रु.46/-

**3) औद्योगिक वापर** :- पाण्याचा वापर धंद्याकरीता करणाऱ्या संस्था, फॅक्टरी, हॉटेल्स, हॉस्पीटल्स, लॉजिंग, रेस्टॉरंटस्, बर्फाचे कारखाने, रेल्वे, एस.टी. व बांधकाम इ.साठी प्रत्येक 1000 लिटर्स करीता रु.74.75/-

**क) पाणीबिल द्विमासिक आकारणी तक्ता - स्थीर आकार**

| व्यास | कमीत कमी मासिक आकारणी | | | मिटर बंद प्रथम 2 महिने | | | मिटर बंद 2 महिन्या नंतर | | | मिटर बंद 6 महिन्या नंतर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मिमि | निवासी | अनिवासी | औद्योगिक | निवासी | अनिवासी | औद्योगिक | निवासी | अनिवासी | औद्योगिक | निवासी | अनिवासी | औद्योगिक |
| 15 | 190 | 858 | 1782 | 572 | 1716 | 3564 | 780 | 2340 | 4860 | 1404 | 4212 | 8748 |
| 20 | 829 | 1430 | 2882 | 1659 | 2860 | 5764 | 2262 | 3900 | 7860 | 4072 | 7020 | 14148 |
| 25 | 1173 | 2134 | 4257 | 2345 | 4268 | 8514 | 3198 | 5820 | 11610 | 5756 | 10476 | 20898 |
| 32 | 1802 | 3388 | 6721 | 3604 | 6776 | 13442 | 4914 | 9240 | 18330 | 8845 | 16632 | 32994 |
| 40 | 2746 | 5225 | 10274 | 5491 | 10450 | 20548 | 7488 | 14250 | 28020 | 13478 | 25650 | 50436 |
| 50 | 4204 | 8096 | 15840 | 8408 | 16192 | 31680 | 11466 | 22080 | 43200 | 20639 | 39744 | 77760 |
| 65 | 6978 | 13574 | 26510 | 13957 | 27148 | 53020 | 19032 | 37020 | 72300 | 34258 | 66636 | 130140 |
| 80 | 10439 | 20438 | 39820 | 20878 | 40876 | 79640 | 28470 | 55740 | 108600 | 51246 | 100332 | 195480 |
| 100 | 23309 | 54120 | 113850 | 46618 | 108240 | 227700 | 63570 | 147600 | 310500 | 114426 | 265680 | 558900 |
| 150 | 52338 | 121660 | 256300 | 104676 | 243320 | 512600 | 142740 | 331800 | 699000 | 256932 | 597240 | 1258200 |
| 200 | 92950 | 216260 | 455510 | 185900 | 432520 | 911020 | 253500 | 589800 | 1242300 | 456300 | 1061640 | 2236140 |
| 250 | 145860 | 337920 | 711810 | 291720 | 675840 | 1423620 | 397800 | 921600 | 1941300 | 716040 | 1658880 | 3494340 |